आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ मार्च २०२५ - मंगळवार

## ठळक बातम्या

- विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं उत्तर, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी नेमलेल्या समितीनं अहवाल दिल्यावर त्यानुसार कारवाई करण्याचं आश्वासन

- छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचा अवमान केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या प्रशांत कोरटकर याला २८ तारखेपर्यंत पोलीस कोठडी

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सचा सामना पंजाब किंग्सबरोबर होणार

**आणि**

- राज्याच्या विविध भागात उष्णता वाढत असल्यानं सार्वजनिक आरोग्य विभागाचा नागरिकांना खबरदारीचा इशारा

**<><><><><>**

विधानसभेत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर दिलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांविरोधात अपशब्द वापरणाऱ्या कोरटकर याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूनंतर झालेल्या शवविच्छेदन अहवालात विसंगती आहे, व्हीसेरा आणि बाह्य अहवाल वेगळा आहे, त्यामुळे या प्रकरणासाठी नेमलेल्या समितीनं अहवाल दिल्यावर त्यानुसार कारवाई करू,

तसंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांनाही सोडलं जाणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

राज्यात हुक्का पार्लरचं वाढतं प्रस्थ रोखण्यासाठी यासंदर्भातल्या कायद्यात सुधारणा करण्याची घोषणा त्यांनी केली. हा गुन्हा दखलपात्र केला जाणार असल्याचं ते म्हणाले.

सहकारी उपनिबंधक कार्यालयातला भ्रष्टाचार रोखण्यासाठी सर्व कामकाज डिजिटल केलं जाणार आहे, त्यासंबंधी आधी तीन आणि नंतर सहा महिन्यात संबंधीत कार्यवाही पूर्ण केली जाणार असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

राज्यातील शहरांमधल्या नद्यांच्या पूर पातळीसंदर्भातल्या निळ्या आणि लाल रेषांचं समिती स्थापन करून तातडीनं पुन्हा सर्वेक्षण करण्याचं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी आज एका लक्षवेधीच्या उत्तरात विधानसभेत दिलं. या रेषेत येणाऱ्या जमिनीवर अवैधरित्या विकासकामांची परवानगी दिली असेल तर ती रद्द करून संबंधितांवर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

बीड जिल्हा रुग्णालयात कोविड काळात झालेल्या भ्रष्टाचारप्रकरणी संबंधित तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकांना निलंबित करून त्यांची तीन महिन्यात चौकशी करू, इतर दोषींवरही कारवाई करू अशी घोषणा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली. मुंबईच्या किनारा नियंत्रण तसंच ना विकास विभागात बेकायदेशीरपणे केलेल्या २६७ बांधकामांविरोधात महापालिकेच्या वतीनं तातडीनं कारवाई करून ती पाडली जातील, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

या प्रकरणात नकाशांमध्ये बेकायदेशीरपणे केलेल्या फेरफार आणि चूकीच्या परवानग्यांबद्दल विशेष चौकशी समिती स्थापन केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

सिंहगड किल्ल्याच्या विकासासाठी संबंधित सर्व यंत्रणा आणि विभागांचा एकत्रित प्रस्ताव १५ दिवसात पाठवणार असून, स्थानिक पातळीवरील सर्व यंत्रणांचा एकत्रित विकास आराखडा तीन महिन्यात तयार करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरात दिली.

**<><><><><>**

विधान परिषदेतही आज अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अतिशय गंभीर असल्याचा आरोप करत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या चर्चेला सुरुवात केली. सरकारची कारवाईची मानसिकता नसल्यानं गुन्हेगारांना अभय मिळू लागलं आहे, असं ते म्हणाले. बीडमध्ये मस्साजोगच्या सरपंच हत्येतील आरोपी अद्याप पकडला गेलेला नाही, सोमनाथ सुर्यवंशी याचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाल्याचं स्पष्ट होऊनही आरोपींविरोधात सरकारानं कारवाई केलेली नाही, याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

सत्ताधारी पक्षाच्या विरोधात बोललं की कारवाई केली जाते, मात्र महामानवांचा अपमान केल्यावर तत्परतेनं कारवाई होत नाही, अशी टीका त्यांनी केली. अनेक प्रकरणांत बुलडोझर लावून मालमत्तेचं नुकसान केलं जातं. यामुळे राज्याची प्रतिमा मलीन होते असं ते म्हणाले. हास्य कलाकार कुणाल कामरा यांनी काहीही चुकीचं वक्तव्य केलेलं नाही, त्यांच्या

स्टुडिओची तोडफोड करणाऱ्यांकडून नुकसान भरपाई वसुल करायला पाहिजे, असं दानवे म्हणाले.

कोकणात रायगडमधल्या रेवसपासून सिंधुदुर्गातल्या रेडी पर्यंतच्या ५२३ किलोमीटरच्या सागरी महामार्गाचं नूतनीकरण करून हा मार्ग चौपदरी ग्रीनफिल्ड मार्ग करणार असल्याचं, मंत्री दादा भुसे यांनी एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. हे काम येत्या तीन वर्षांत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या घरातून रोकड जप्त केल्याच्या मुद्द्यावरुन राज्यसभा अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज संध्याकाळी सभागृह नेत्यांची बैठक बोलावली आहे. हा गंभीर विषय असून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढला जाईल, असं जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी संबंधित निधी न मिळाल्याबद्दल आज लोकसभेत गदारोळ झाल्यामुळे लोकसभेच कामकाज तहकूब कराव लागलं. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान, काँग्रेस, द्रमुक, तृणमूल काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि इतर राज्यांसाठी प्रलंबित निधीवरून गोंधळ घातला. पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना, ग्रामीण विकास राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी यांनी पश्चिम बंगालमध्ये मनरेगा निधीचा गैरवापर आणि योजनेच्या अंमलबजावणीत अनियमिता असल्याचं सांगितलं. तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल सरकारांना

निधी वितरित करण्यासाठी अनुपालन अहवाल सादर करण्याची विनंती केली. मात्र या उत्तरावर असमाधानी असलेल्या विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात गोंधळ घातला.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप असलेल्या प्रशांत कोरटकरला कोल्हापूर पोलिसांनी तेलंगणातून अटक केली आहे. कोरटकर याने २४ फेब्रुवारी रोजी इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोनद्वारे धमकी दिली होती. त्या दिवसापासून कोरटकर हा फरार होता. कोरटकरला आज कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं. यावेळी पोलिसांनी सात दिवसांची कोठडी देण्याची विनंती केली. मात्र, न्यायालयानं कोरटकर याला २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

<><><><><>

आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. दोन्ही संघांचा हा सलामीचा सामना असणार आहे. अहमदाबाद इथं संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

दरम्यान स्पर्धेत लखनऊ सुपर जाएंट्स आणि दिल्ली कॅपीटल्स यांच्यात झालेला रोमहर्षक सामना दिल्लीनं एक गडी राखून जिंकला. या सामन्यात लखनऊनं विजयासाठी दिलेलं २१० धावांचं आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीचा निम्मा संघ केवळ ६५ धावांमध्येच तंबूत परतला होता. मात्र स्टब्स, विपराज आणि नाबाद अर्धशतकवीर आशुतोष

शर्मा यांनी तडाखेबंद फलंदाजी करत दिल्लीला अशक्यप्राय विजय मिळवून दिला.

<><><><><>

नवी दिल्ली इथे सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये महाराष्ट्र पदकतालिकेत पाचव्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्राच्या खात्यात एकूण ३६ पदकं असून त्यात १४ सुवर्ण, १३ रौप्य आणि ९ कास्यपदकांचा समावेश आहे. हरयाणा ९५ पदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

<><><><><>

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत, भारताच्या युकी भांब्री आणि पोर्तुगालच्या नुनो बोर्जेस यांच्या जोडीनं पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी चेकियाच्या ॲडम पावलासेक आणि युनायटेड किंग्डमच्या जेमी मरे या जोडीचा ७-६, ६-२ असा पराभव केला. त्यांचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना उद्या युनायटेड किंग्डमच्या लॉयड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश यांच्याशी होईल.

<><><><><>

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबन गीत सादर करणारा हास्य कलाकार कुणाल कामरा यानं माफी मागायला नकार दिला आहे. आपल्या कार्यक्रम स्थळाची शिंदे यांच्या समर्थकांकडून केलेल्या तोडफोडीचाही त्याने निषेध केला. कुणाल कामरानं एका लोकप्रिय हिंदी गाण्याच्या चालीवर एकनाथ शिंदे आणि शिवसेना फुटीच्या संदर्भात टिप्पणी केली होती. हे गाणे व्हायरल झाल्यानंतर शिंदे यांच्या समर्थकांनी त्याच्या स्टुडिओत तोडफोड केली होती. त्याने केलेल्या टिप्पणीवर एमआयडीसी

पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून नंतर तो खार पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात उष्णता वाढत असून संभाव्य उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागानं नागरिकांना खबरदारीचा इशारा दिला आहे. आरोग्य विभागानं सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष सुरू केले आहेत. सर्व जिल्हा आणि महापालिका स्तरांवरच्या साथरोग वैद्यकीय अधिकाऱ्यांना उष्माघात विषयक प्रशिक्षण देण्यात आलं आहे. राज्यात २१ मार्चपर्यंत उष्माघाताचे २१ रुग्ण आढळून आले आहेत.

**//<><><><><>//**